दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...


**आजचे पंचांग**

दिनांक : १९ सप्टेंबर २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : भाद्रपद ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : अष्टमी तिथी (दुपारी ०१:०० पर्यंत) त्यानंतर नवमी तिथी नक्षत्र : मूळ नक्षत्र (रात्री १०:४४ पर्यंत) त्यानंतर पूर्वाषाढा नक्षत्र योग : आयुष्मान योग (दुपारी ०१:३४ पर्यंत) त्यानंतर सौभाग्य योग करण : भाव करण (दुपारी ०१:०० पर्यंत) त्यानंतर बलवा करण चंद्र राशी : धनु राशी सूर्य राशी : कन्या राशी

**बोर्डाच्या परीक्षांच्या तारखा जाहीर**

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या २०२७ मधील वार्षिक परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर केले आहे. यानुसार, बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारीपासून, तर दहावीची परीक्षा १५ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. बोर्डाने ही अधिकृत घोषणा केल्यामुळे आता विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या नियोजनासाठी पुरेसा वेळ मिळणार आहे. पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, लातूर आणि कोकण या राज्यातील सर्व ९ विभागीय मंडळांमार्फत या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. अंतिम विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक लवकरच मंडळाच्या अधिकृत वेबसाईटवर उपलब्ध करून दिले.


आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. १९ सप्टेंबर २०२६ | वर्ष - १ | अंक - ३५२ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड


# टीका योग्य मंचावर; मग सत्तेची चिकित्सा कोणत्या मंचावर?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

न्यायव्यवस्थेवरील विधायक, माहितीपूर्ण आणि तथ्याधारित टीका ही लोकशाहीसाठी आवश्यक असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबर रोजी स्पष्ट केले. त्यानंतर १५ सप्टेंबर रोजी सरन्यायाधीश सूर्यकांत यांनीही न्यायव्यवस्था सार्वजनिक विश्वास मिळवण्यासाठी स्वतःला छाननीच्या पलीकडे ठेवू शकत नसल्याचे सांगितले. त्यामुळे हा संदेश केवळ न्यायव्यवस्थेपुरता मर्यादित न राहता संपूर्ण घटनात्मक व्यवस्थेसाठी महत्त्वाचा ठरतो.

मात्र, याच ठिकाणी लोकशाहीसमोरचा खरा प्रश्न उभा राहतोटीका योग्य मंचावरूनच झाली पाहिजे, तर सत्तेच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करण्यासाठी सामान्य नागरिकाला किती आणि कोणते मंच उपलब्ध आहेत?

सर्वोच्च न्यायालयाने ९ सप्टेंबरच्या प्रकरणात टीकेला विरोध केला नाही. उलट, न्यायव्यवस्थेची निष्पक्ष, माहितीपूर्ण आणि विधायक चिकित्सा ही घटनात्मक लोकशाहीचा आवश्यक भाग असल्याचे स्पष्ट केले. न्यायालयाने आक्षेप घेतला तो अप्रमाणित दावे शालेय अभ्यासक्रमात तथ्य म्हणून मांडण्यावर.




म्हणून 'न्यायालयाने टीकेची भाषा बदलली' किंवा 'आंदोलनानंतर न्यायालयाची भूमिका बदलली' असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. उपलब्ध नोंदी पाहता ९ सप्टेंबरचा आदेश आणि १५ सप्टेंबरचे सरन्यायाधीशांचे भाषण दोन्ही जबाबदार टीका आणि संस्थात्मक उत्तरदायित्व याच तत्त्वावर भर देतात.

पण या तत्त्वाची खरी परीक्षा न्यायालयापुरती नाही. संसद, सरकार, प्रशासन, निवडणूक व्यवस्था आणि प्रत्येक सार्वजनिक संस्था ही लोकांच्या प्रश्नांना उत्तरदायी असली पाहिजे. सत्ताधाऱ्यांच्या धोरणांवर प्रश्न विचारणाऱ्या पत्रकाराला, विद्यार्थ्याला किंवा आंदोलकाला 'अयोग्य टीका' म्हणून गप्प बसवले जात नाही ना, हेही तितकेच महत्त्वाचे.

लोकशाहीत संस्थांचा सन्मान म्हणजे त्यांच्यावर मौन लादणे नव्हे. संस्थेची प्रतिष्ठा ही प्रश्न न विचारण्यात नसते; प्रश्न विचारल्यानंतर तथ्य, कारणे आणि पारदर्शक उत्तर देण्याच्या क्षमतेत असते.

'मोदी राजवट' असो किंवा कोणतीही पुढील सत्ता लोकशाहीची खरी कसोटी व्यक्ती बदलण्यात नाही, तर सत्तेला प्रश्न विचारण्याचा नागरिकांचा अधिकार अबाधित राहण्यात आहे. न्यायालयाने टीकेसाठी योग्य मंचाची जी कसोटी मांडली आहे, तीच कसोटी सत्तेनेही स्वीकारली तरच 'विधायक टीका' हा शब्द प्रत्यक्ष लोकशाही संस्कृती बनेल.

## सारांश वृत्त

### सवलतीचा प्रवास डिजिटल झाला; पण सामान्य प्रवाशांची कसरत कायम!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई : प्रतिनिधी

एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिक, अमृत ज्येष्ठ नागरिक आणि महिला सवलतधारकांसाठी एनसीएमसी कार्ड प्रक्रिया अधिक सुलभ करण्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात बायोमेट्रिक, आधार ओटीपी, क्यूआर पावती, कार्ड ॲक्टिव्हेशन आणि टॉप-अप अशा अनेक टप्प्यांमुळे सामान्य प्रवाशांसमोर नवी कसरत उभी राहण्याची शक्यता आहे.

बोटांचे ठसे जुळले नाहीत तर आधारशी जोडलेल्या मोबाईलवर ओटीपी, कार्ड हरवले तर ब्लॉक करून १९९ रुपये शुल्क, नोंदणी केल्यानंतर ठरावीक कालावधीत कार्ड ॲक्टिव्ह करणे आणि त्यात टॉप-अप करणेही प्रक्रिया तांत्रिकदृष्ट्या योग्य असली तरी डिजिटल सुविधा आणि डिजिटल साक्षरता या दोन वेगळ्या गोष्टी आहेत.

विशेषतः ज्येष्ठ नागरिकांपैकी अनेकांना स्मार्टफोन, ओटीपी, क्यूआर कोड किंवा ऑनलाइन टॉप-अपची सवय नसते. त्यामुळे 'डिजिटल सुलभता' प्रत्यक्षात 'डिजिटल अडथळा' ठरू नये, याची काळजी महामंडळाने घेणे गरजेचे आहे.

नोंदणी केलेल्या प्रवाशांना २५ सप्टेंबरपासून कार्ड उपलब्ध होणार आहे. मात्र, तोपर्यंत क्यूआर पावतीवर सवलतीचे तिकीट देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

सवलत ही शासनाची सुविधा आहे; ती मिळवण्यासाठी तंत्रज्ञानाची परीक्षा घेणे हा तिचा उद्देश नसावा. एसटीने प्रत्येक आगारात मदत केंद्र, प्रशिक्षित कर्मचारी आणि ऑफलाइन सहाय्याची ठोस व्यवस्था केली, तरच ही डिजिटल प्रक्रिया खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांच्या उपयोगाची ठरेल.

## शिवसेना-राष्ट्रवादीनंतर टीएमसी; राहुल गांधींनी सांगितला पक्षफोडीचा 'पॅटर्न'; भाजपसह निवडणूक आयोगावर केले गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

तृणमूल काँग्रेस पक्षाच्या नाव आणि निवडणूक चिन्हासंदर्भात निवडणूक आयोगाने घेतलेल्या निर्णयावरून काँग्रेस नेते तथा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपसह निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तृणमूल काँग्रेसच्या वादाच्या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी एक्सवर एक पोस्ट करत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आता तृणमूल काँग्रेसच्या प्रकरणात एकसारखा पॅटर्न दिसत असल्याचं म्हटलं आहे. राहुल गांधी यांनी म्हटलं की, 'आधी शिवसेना, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि आता तृणमूल काँग्रेस. प्रत्येक वेळी भाजप आणि निवडणूक आयोग मिळून एखादा पक्ष फोडतात आणि त्यानंतर त्या पक्षाचे निवडणूक चिन्ह काढून घेतले जाते. 'संपूर्ण पक्षच चोरीला जाऊ शकतो, तर कोट्यवधी भारतीयांची मते चोरीला जाणेही आश्चर्यकारक नाही, मतांची चोरी, सरकारची चोरी आणि आता पक्षाची चोरी' हे लोकशाहीच्या ऱ्हासाचे प्रतीक बनले आहे, असंही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. निवडणूक आयोगाच्या घटनात्मक जबाबदारीवरही राहुल गांधी यांनी प्रश्न उपस्थित केला. आयोगाची जबाबदारी जनादेशाचे रक्षण करण्याची आहे. मात्र, जनतेचा कौलच बदलून टाकणाऱ्या शक्तींना आयोग मदत करत असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला.

ही लढाई केवळ पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांची नसून, स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणुकांची अपेक्षा असलेल्या प्रत्येक राजकीय पक्षाची आणि मतदाराची असल्याचे राहुल गांधी यांनी म्हटले आहे.

पश्चिम बंगालमधील विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसमध्ये फूट पडली आहे. पक्षातील बंडखोर आमदारांनी स्वतंत्र गट स्थापन केला असून अरूप रॉय हे या गटाचे नेतृत्व करत आहेत. यानंतर तृणमूल काँग्रेसचे नाव आणि निवडणूक चिन्ह यावरून दोन्ही गटांमध्ये वाद निर्माण झाला. हा वाद निवडणूक आयोगापर्यंत पोहोचला.

या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने अंतरिम व्यवस्था लागू केली आहे. ममता बॅनर्जी आणि अरूप रॉय यांच्या नेतृत्वाखालील दोन्ही गटांना सध्या 'ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि पक्षाचे आरक्षित निवडणूक चिन्ह वापरण्यास मनाई केली आहे.

## पुणे फेस्टिव्हलचा संदेश स्पष्ट : उत्सव संस्कृतीचा, राजकारणाचा नव्हे!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय साधताना सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी पुणे फेस्टिव्हलच्या उद्घाटनप्रसंगी दिला. या पार्श्वभूमीवर पुण्यासारख्या बहुविध सांस्कृतिक परंपरा असलेल्या शहरातील उत्सवांमध्ये सर्व राजकीय पक्षांनी धर्मनिरपेक्षता, सर्वसमावेशकता आणि सामाजिक सलोख्याचे संकेत पाळणे अपेक्षित आहे.

पुणे फेस्टिव्हलने कला, संगीत, नृत्य, साहित्य, क्रीडा आणि पर्यटनाला एकाच व्यासपीठावर आणले आहे. विविध देशांतील विद्यार्थ्यांचा सहभाग ही सांस्कृतिक देवाणघेवाणीची व्यापकता दर्शविणारी बाब आहे. अशा महोत्सवांची ओळख कोणत्याही एका राजकीय विचारसरणीशी किंवा धार्मिक वर्चस्वाशी जोडली जाऊ नये.

राजकीय पक्ष आणि लोकप्रतिनिधी उत्सवांमध्ये सहभागी होतात, त्याचे स्वागतच; मात्र उत्सवाचा मंच हा मतविभाजनाचा मंच



होऊ नये, ही लोकशाहीतील मूलभूत अपेक्षा आहे. गणेशोत्सव असो, पुणे फेस्टिव्हल असो किंवा अन्य सार्वजनिक सांस्कृतिक कार्यक्रम सर्व समाजघटकांना समान सन्मान आणि सहभागाची भावना प्रत्यक्ष कृतीत दिसली पाहिजे.

'विकसित भारत'ची चर्चा केवळ पायाभूत सुविधा आणि आर्थिक वाढीपुरती मर्यादित नसून विविधता, भाषा, कला आणि परंपरांचे संरक्षणही त्याचा भाग असल्याचे उपराष्ट्रपतींनी नमूद केले. म्हणूनच प्रश्न केवळ उत्सव किती भव्य झाला याचा नाही; तो किती समावेशक राहिला, याचाही आहे. राजकारणाने उत्सवाला आपले व्यासपीठ बनवण्याऐवजी उत्सवाने समाजाला जोडणारे व्यासपीठ राहणे, हीच पुण्याच्या सांस्कृतिक परंपरेला खरी मानवंदना ठरेल.

# पाकिस्तानच्या केपी प्रांतात हाहाकार; कोहाट जिल्ह्यातील मशिदीवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात १५ नागरिकांचा मृत्यू!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लाहोर : वृत्तसंस्था

पाकिस्तानमधून एक अत्यंत हादरवून टाकणारी मोठी बातमी समोर आली आहे. पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात शुक्रवारी दुपारी नमाजादरम्यान एका मशिदीला लक्ष्य करून भीषण आत्मघाती स्फोट घडवून आणण्यात आला. या भयंकर हल्ल्यात तब्बल १५ जणांचा मृत्यू झाला असून, सुमारे ५० हून अधिक लोक गंभीर जखमी झाले आहेत. शुक्रवारचा दिवस असल्यामुळे मशिदीच्या आत आणि बाहेर मोठी गर्दी होती, ज्यामुळे या हल्ल्यात मोठ्या प्रमाणावर जीवितहानी झाली आहे. जखमींमध्ये अनेक पोलिसांचाही समावेश आहे.

समोर आलेल्या माहितीनुसार, हा स्फोट कोहाट जिल्ह्यातील जुन्या पोलीस लाइन्सच्या परिसराजवळ असलेल्या एका मशिदीत झाला. डिस्ट्रिक्ट हेडक्वार्टर रुग्णालयाचे एमएस ताहिर अली शाह यांनी 'जिओ न्यूज'ला माहिती दिली की, स्फोटानंतर १५ जणांचे मृतदेह आणि ५० हून अधिक जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अनेकांची प्रकृती चिंताजनक असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा स्फोट इतका शक्तिशाली




होता की, त्यामुळे मशिदीचा बाहेरील भाग आणि एक मोठी भिंत पूर्णपणे कोलमडली असून जमिनीवर मोठा खड्डा पडला आहे.

आत्मघाती हल्ला आणि गोळीबार

खैबर पख्तूनख्वाचे पोलीस महानिरीक्षक जुल्फिकार हमीद यांनी या घटनेला दुजोरा दिला आहे. त्यांनी सांगितले की, स्फोटापूर्वी स्फोटकांनी भरलेले एक वाहन जुन्या पोलीस लाइन्सच्या गेटवर धडकले, त्यानंतर मोठा स्फोट झाला आणि पाठोपाठ अंधाधुंद गोळीबारही करण्यात आला. हा एक सुनियोजित आत्मघाती हल्ला होता. गोळीबाराच्या दरम्यान स्पेशल ब्रांचच्या इमारतीत आणखी एक आत्मघाती स्फोट झाल्याची माहिती समोर आली आहे. सेंट्रल पोलिसांनी दिलेल्या निर्देशानुसार, आयजीपी हमीद यांनी कोहाटच्या प्रादेशिक पोलीस अधिकाऱ्यांकडून या संपूर्ण प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागवला आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी संपूर्ण परिसरात अतिरिक्त सुरक्षा दल तैनात केले आहे आणि कोहाट-हंगू रस्ता सुरक्षेच्या कारणास्तव वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद करण्यात आला आहे. डीएचक्यू प्रशासनाने रुग्णालयात आणीबाणी घोषित केली आहे.

पाकिस्तानच्या खैबर पख्तूनख्वा प्रांतात गेल्या काही काळापासून हिंसाचार आणि अशांततेचे वातावरण पाहायला मिळत आहे. या भागात अनेक दहशतवादी व सशस्त्र गट सक्रिय असून त्यांनी पाकिस्तानी सरकार आणि सैन्याविरोधात बंड पुकारले आहे. हे गट सातत्याने लष्करी ठिकाणे आणि सुरक्षा रक्षकांना लक्ष्य करत आहेत.

# अमली पदार्थांच्या वाढत्या गुन्ह्यांवर मोदी सरकारचा 'कन्स्ट्रक्टिव्ह प्लॅन' काय?

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

देशभरात अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांची वाढ आणि त्यातून निर्माण झालेली न्यायालयीन प्रकरणांची प्रचंड संख्या यावर सर्वोच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. छ्ड्ड्ड कायद्यांतर्गत खटल्यांचा जलद निपटारा व्हावा यासाठी केंद्र सरकार, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी आवश्यक विशेष न्यायालये उभारण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, असे न्यायालयाने निर्देश दिले आहेत. ही प्रक्रिया शक्यतो सहा आठवड्यांत पूर्ण करण्याच्या दिशेने काम करण्यासही सांगण्यात आले आहे.

आकडे सरकारसमोरील आव्हानाची व्याप्ती दाखवतात. देशभरात छ्ड्ड्ड प्रकरणांसाठी ४४९ विशेष न्यायालयांची गरज असल्याचे केंद्राच्या वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. त्यापैकी आतापर्यंत १७६ न्यायालये कार्यरत असल्याची माहिती देण्यात आली. म्हणजेच आवश्यक न्यायालयीन क्षमतेतील मोठा भाग अद्याप उभारायचा आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा भर केवळ न्यायालयांची संख्या वाढवण्यावर नाही. आवश्यक पायाभूत सुविधा, न्यायालयीन आणि प्रशासकीय मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि प्रलंबित खटल्यांना गती देणे हीदेखील सरकारची जबाबदारी आहे.

मात्र इथेच एक मोठा सार्वजनिक प्रश्न उभा राहतो.


अमली पदार्थांच्या वाढत्या समस्येवर केंद्र सरकारचा दीर्घकालीन आणि सर्वकष 'कन्स्ट्रक्टिव्ह प्लॅन' नेमका काय आहे?

न्यायालये वाढवणे हा न्यायप्रक्रियेचा महत्त्वाचा भाग आहे. मात्र अमली पदार्थांचा पुरवठा कुठून होतो, मोठ्या तस्करीच्या नेटवर्कवर किती प्रभावी कारवाई होते, सीमावर्ती आणि बंदर क्षेत्रातील तपास व्यवस्था किती सक्षम आहे, आर्थिक व्यवहारांचा मागोवा कसा घेतला जातो आणि तरुणांमध्ये वाढणाऱ्या व्यसनाच्या समस्येला प्रतिबंध करण्यासाठी आरोग्य व पुनर्वसन व्यवस्था किती मजबूत आहेहे प्रश्नही तितकेच महत्त्वाचे ठरतात. इथेच सरकारसमोर 'आणखी एक स्वतंत्र तपास यंत्रणा' की विद्यमान यंत्रणांमध्ये अधिक समन्वय आणि क्षमता? हा धोरणात्मक प्रश्न उभा राहतो. NIA, नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो, राज्य पोलिस, सीमाशुल्क आणि इतर संबंधित यंत्रणांमध्ये माहितीची देवाणघेवाण, संयुक्त तपास, आर्थिक नेटवर्कवर कारवाई आणि खटल्यांच्या प्रगतीचे नियमित परीक्षण यासाठी प्रभावी समन्वय यंत्रणा किती सक्षम आहे, याचीही सार्वजनिक चर्चा होणे आवश्यक आहे.

कारण केवळ गुन्हा दाखल फ तपास फ आरोपपत्र फ न्यायालय फ निकाल या साखळीतील शेवटचा टप्पा वेगवान करून संपूर्ण समस्या सुटणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने आता सरकारसमोर स्पष्ट लक्ष्य ठेवले आहेआवश्यक विशेष न्यायालये उभारणे आणि प्रलंबित खटल्यांना गती देणे.

**आता जनतेचा प्रश्न असा असू शकतो:**

४४९ न्यायालयांचे लक्ष्य पूर्ण करण्याबरोबरच अमली पदार्थांच्या मूळ पुरवठा-साखळीवर, आर्थिक नेटवर्कवर आणि व्यसनाच्या सामाजिक परिणामांवर केंद्र सरकारचा ठोस, पारदर्शक आणि दीर्घकालीन आराखडा काय आहे? विशेष न्यायालये वाढतील; पण अमली पदार्थांचे जाळे कमी करण्यासाठी सरकारचा 'कन्स्ट्रक्टिव्ह प्लॅन' कधी दिसणार?



## संपादकीय

### अंबानींच्या बाप्पाला समुद्राची विशेष परवानगी, इतरांच्या बाप्पासाठी कृत्रिम तलाव का?

### लाल कार्पेट श्रीमंतांसाठी आणि कृत्रिम तलाव सामान्यांसाठी?

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. श्रीमंत-गरीब, जात-पात, पक्ष-मतभेद यांच्या पलीकडे जाऊन लाखो भाविक या उत्सवात सहभागी होतात. त्यामुळेच गणेशोत्सवातील नियमही सर्वांसाठी समान असतील, अशी अपेक्षा स्वाभाविक आहे. पण विसर्जनाच्या नियमांभोवती निर्माण झालेला वाद आता एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारत आहे अंबानींच्या बाप्पाला समुद्रात विसर्जनाची विशेष परवानगी आहे का आणि सामान्यांच्या बाप्पाला कृत्रिम तलावच का?

हा प्रश्न खासदार अरविंद सावंत यांचे स्वीय सचिव दीपक घोगल यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे त्याकडे केवळ राजकीय आरोप म्हणून नव्हे, तर प्रशासनाने स्पष्ट उत्तर द्यावे असा सार्वजनिक प्रश्न म्हणून पाहणे आवश्यक आहे.

यंदा मुंबईत गणेशमूर्तींच्या विसर्जनाबाबत सहा फुटांचा निकष लागू आहे. बॉम्बे उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सहा फुटांपर्यंतच्या पीओपी मूर्तींचे विसर्जन कृत्रिम जलसाठ्यात करायचे असून, सहा फुटांपेक्षा मोठ्या मूर्तींना नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जनाची मुभा आहे. इचउनेही याच नियमाची अंमलबजावणी जाहीर केली आहे. (ळपवीींरप ढळाशीऋश्र)

मग प्रश्न अधिक नेमका होतो. नियमाचा आधार मूर्तीची उंची आहे की व्यक्तीची ओळख? जर उंची, मूर्तीचा प्रकार आणि पर्यावरणीय निकष हेच नियम असतील, तर ते प्रत्येकासाठी समान असले पाहिजेत. आणि एखाद्या विशिष्ट व्यक्तीला किंवा कुटुंबाला त्यापेक्षा वेगळी परवानगी देण्यात आली असेल, तर त्यामागील कायदेशीर आणि प्रशासकीय आधारही सार्वजनिक केला पाहिजे.

मुंबईतील गिरगाव चौपाटीसह विविध ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांची व्यवस्था करण्यात आली आहे. गिरगाव चौपाटीवर कृत्रिम तलाव उभारण्यासाठी इचउने निविदाही काढली आहे. (अींरऑऋश्र) त्यामुळे पर्यावरणरक्षणासाठी कृत्रिम तलाव ही व्यवस्था सर्वसामान्यांसाठीच आहे, अशी भावना निर्माण होणे साहजिक आहे. गिरगाव आणि लालबाग परिसरातील मूर्तिकार व गणेश मंडळांनीही सहा फुटांखालील मूर्तींना समुद्रात विसर्जनाची परवानगी द्यावी, अशी मागणी केली आहे. (चळव-ृरूऋश्र)

पर्यावरणाचे संरक्षण आवश्यकच आहे. समुद्र, नद्या आणि नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण टाळण्यासाठी नियम असलेच पाहिजेत. पण पर्यावरणाच्या नावाखाली नियम बनवून ते सामान्य नागरिकांसाठी कठोर आणि प्रभावशालींसाठी वेगळे असतील, तर प्रश्न पर्यावरणाचा राहत नाही; तो समानतेच्या राज्यघटनात्मक तत्त्वाचा बनतो.

अंबानी कुटुंबाला समुद्रात विसर्जनासाठी खरोखर काही विशेष परवानगी देण्यात आली असेल, तर ती कोणत्या नियमाखाली? परवानगी कोणी दिली? मूर्तीची उंची किती होती? ती परवानगी सर्व गणेशभक्तांना उपलब्ध आहे का? आणि नसेल तर त्याचे कारण काय? हे प्रश्न प्रशासनाने स्पष्ट करावेत. उलट अशी कोणतीही विशेष परवानगी नसून विसर्जन नियमांनुसारच झाले असेल, तर तेही स्पष्टपणे सांगण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे.

लोकशाहीत प्रश्न विचारणाऱ्याला विरोध करण्यापेक्षा प्रश्नाचे उत्तर देणे महत्त्वाचे असते.

कारण सामान्य माणसाच्या मनात निर्माण होणारा संशय दुर्लक्षित करून प्रशासन पारदर्शक राहू शकत नाही. एका भाविकासाठी समुद्र निषिद्ध आणि दुसऱ्यासाठी समुद्र खुला असेल, तर नियमांच्या समानतेवर प्रश्न निर्माण होणारच. आणि जर नियम सर्वांसाठी समान असतील, तर त्यांची अंमलबजावणीही समान दिसली पाहिजे.

गणरायाच्या उत्सवातच जर आर्थिक ताकद, राजकीय जवळीक किंवा व्हीआयपी दर्जानुसार वेगवेगळे नियम असल्याची भावना निर्माण झाली, तर हा केवळ विसर्जनाचा प्रश्न राहणार नाही. तो राज्यव्यवस्थेवरील विश्वासाचा प्रश्न बनेल.

पर्यावरण वाचवा, पण नियमांचा विश्वासही वाचवा. अंबानींच्या बाप्पाला विशेष परवानगी असेल तर तिचा आधार सांगा; नसेल तर विशेष सवलतीची चर्चा का निर्माण झाली, हे स्पष्ट करा.

गणपती सर्वांचा आहे. त्यामुळे त्याच्या विसर्जनाचे नियमही सर्वांसाठी समान असले पाहिजेत. लाल कार्पेट कोणासाठी आणि कृत्रिम तलाव कोणासाठी, याचे उत्तर प्रशासनाने जनतेला देणे गरजेचे आहे.

# गणेशोत्सवाचा सांस्कृतिक वारसा आता डिजिटल स्वरूपात जतन होणार

## "Bappa.org' वर परंपरा, आठवणी आणि उत्सवाचे क्षण नोंदविण्याचे महापौर-आयुक्तांचे

■ पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

गणेशोत्सवाशी जोडलेल्या कौटुंबिक आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या आठवणी, परंपरा, कला आणि सांस्कृतिक अनुभव आता डिजिटल स्वरूपात जतन करता येणार आहेत. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने गणेशोत्सवाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दस्तऐवजीकरण व संवर्धन करण्यासाठी "Bappa.org' हा डिजिटल उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महापौर रवि लांडगे आणि आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची ओळख औद्योगिक विकासासोबतच विविध भागांतून आलेल्या नागरिकांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक सहभागामुळेही निर्माण झाली आहे. शहरातील अनेक कुटुंबे आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे वर्षानुवर्षे आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने गणेशोत्सव साजरा करतात. आरत्या, पारंपरिक प्रथा, सजावट, नैवेद्य, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम आणि बाप्पाशी जोडलेल्या कौटुंबिक आठवणींमधून गणेशोत्सवाचे विविध पैलू समोर येतात.

"Bappa.org' या डिजिटल व्यासपीठावर नागरिकांना आपल्या गणेशोत्सवाशी संबंधित विविध स्वरूपातील माहिती नोंदविता येणार आहे. घरातील गणपतीच्या आरत्या व पारंपरिक प्रथा, कुटुंबातील जुन्या आठवणी, पारंपरिक पाककृती, गणेशमूर्तींची छायाचित्रे, सजावटीचे फोटो व व्हिडिओ, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे उपक्रम, सामाजिक कार्य तसेच उत्सवाशी संबंधित अनुभव नागरिकांना शेअर करता येतील.

गणेशोत्सवातील प्रत्येक परंपरेमागे एखादी आठवण, कला किंवा अनेक वर्षांची सांस्कृतिक परंपरा दडलेली असते. आज नोंदविलेले हे अनुभव भविष्यातील पिढ्यांसाठी महत्त्वाचे सांस्कृतिक दस्तऐवज ठरू शकतात. त्यामुळे पिंपरी-चिंचवडमधील नागरिक, कुटुंबे आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी आपल्या उत्सवाशी संबंधित वैशिष्ट्यपूर्ण माहिती, छायाचित्रे आणि आठवणी "Bappa.org' वर नोंदवाव्यात, असे महापालिकेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

महापौर रवि लांडगे म्हणाले : गणेशोत्सव हा श्रद्धेसोबतच सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरा जपणारा उत्सव आहे. राज्याच्या विविध भागांत नागरिक आपापल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने हा उत्सव साजरा करतात.

आरत्या, प्रथा, आठवणी, कला आणि सामाजिक उपक्रमांची डिजिटल नोंद होणे म्हणजे आपल्या सांस्कृतिक वारशाच्या जतनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे. "Bappa.org'च्या माध्यमातून गणेशोत्सवातील विविध पैलूंना व्यापक व्यासपीठ मिळावे आणि हा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचावा, यासाठी नागरिकांनी आणि गणेशोत्सव मंडळांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले : गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग असून त्यामध्ये श्रद्धेसोबत कला, लोकपरंपरा, सामाजिक सहभाग आणि सामुदायिक एकोपा यांचेही दर्शन घडते.

या उत्सवाशी जोडलेल्या विविध परंपरा आणि आठवणींची नोंद राज्य शासनाच्या डिजिटल उपक्रमातून व्हावी, यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे. या उपक्रमामुळे महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाचा वैविध्यपूर्ण सांस्कृतिक वारसा डिजिटल स्वरूपात जतन होण्यास मदत होईल.

# गणेशम फेज २ सोसायटीत आग

## दोन चिमुरड्यांची सुखरूप सुटका; नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्या सतर्कतेमुळे अनर्थ टळला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पिंपरी शहरातील गणेशम फेज २ सोसायटीमध्ये अचानक आग लागल्याची घटना घडली. आगीची माहिती मिळताच नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी तत्परता दाखवत घटनास्थळी धाव घेतली आणि तातडीने अग्निशमन दलाला पाचारण केले. आगीच्या धुरात एका खोलीत अडकलेल्या दोन चिमुरड्यांची अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.



आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाची वाहने काही वेळातच घटनास्थळी दाखल झाली. खोलीत दोन लहान मुले अडकल्याचे समजताच जवानांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. धुराचे लोट आणि आगीची तीव्रता याची पर्वा न करता जवानांनी दोन्ही चिमुरड्यांना सुरक्षितपणे बाहेर काढले.

दरम्यान, अग्निशमन दलाच्या जवानांकडून आग नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते. आग नेमकी कोणत्या कारणामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आगीमुळे झालेल्या नुकसानीची माहितीही उपलब्ध झालेली नाही.

या वेळी नगरसेविका अनिताताई काटे आणि नगरसेविका कुंदाताई भिसे यांच्यासह नागरिक घटनास्थळी उपस्थित होते. नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी वेळीच अग्निशमन दलाला पाचारण केल्याने तसेच जवानांनी तातडीने बचावकार्य केल्याने संभाव्य जीवितहानी टळली.

## वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर पिंपरी-चिंचवड पोलिसांचा 'दंडुका'

■ पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी

शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक शिस्तबद्ध करण्यासाठी पिंपरी-चिंचवड वाहतूक पोलिसांनी २०२६ मध्ये वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांविरोधात धडक कारवाई केली आहे. वर्षभरात आतापर्यंत तब्बल ५ लाख ७२ हजार १८ वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली असून, या कारवाईतून तब्बल ६३ कोटी ७८ लाख ४७ हजार ६५० रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे.

शहरातील वाढती वाहतूक, नियमांचे उल्लंघन आणि बेशिस्त वाहनचालकांमुळे अपघातांचा धोका वाढत असल्याने वाहतूक पोलिसांनी विविध नियमभंगांविरोधात विशेष मोहीम राबवली. या मोहिमेत विनाहेल्मेट वाहन चालविणे, फॅन्सी किंवा नियमबाह्य नंबर प्लेट, वाहनांच्या काचांना काळी फिल्म लावणे तसेच मॉडिफाइड सायलेन्सरचा वापर करणाऱ्या वाहनचालकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्याबरोबरच गंभीर स्वरूपाचे नियमभंग करणाऱ्यांविरोधात कायद्यानुसार पुढील कारवाई केली जात आहे. नियमांचे वारंवार उल्लंघन करणाऱ्या काही वाहनचालकांचे वाहनचालक परवाने निलंबित करण्याचे प्रस्ताव संबंधित प्राधिकरणाकडे पाठविण्यात येणार आहेत. वाहतूक नियम हे केवळ दंड आकारण्यासाठी नसून, रस्त्यावरील प्रत्येक नागरिकाची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी आहेत. त्यामुळे दुचाकीस्वारांनी हेल्मेटचा वापर करावा, वाहनांवर नियमबाह्य नंबर प्लेट किंवा काळी काच वापरू नये तसेच वाहनांमध्ये अनधिकृत बदल करू नयेत, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

# उन्नती सोशल फाउंडेशनचा 'आशीर्वादाचा दिवा' उपक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

पंतप्रधान मा. श्री. नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने 'आशीर्वादाचा दिवा' या संकल्पनेअंतर्गत विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी ७६ दिव्यांनी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रतिमेचे औक्षण करण्यात आले. तसेच समाजाच्या स्वच्छतेसाठी सातत्याने कार्यरत असलेल्या ७६ सफाई कामगारांना उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने छत्र्यांचे वाटप करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महिनाभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. समाजातील विविध घटकांपर्यंत सेवा पोहोचविणे, स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देणारे उपक्रम राबविण्यावर या अभियानात भर देण्यात येणार आहे.

यावेळी उन्नती सोशल फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा नगरसेविका डॉ. सौ. कुंदाताई संजय भिसे म्हणाल्या, पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त 'आशीर्वादाचा दिवा' प्रज्वलित करताना सफाई कामगार माता-भगिनी व बांधवांच्या हस्ते आरती करण्याचा मान देण्यात आला. देशसेवेसाठी समर्पित नेतृत्वाला उदंड आयुष्य लाभावे आणि विकसित भारताचे स्वप्न साकार व्हावे, यासाठी या दिव्याच्या माध्यमातून प्रार्थना करण्यात आली आहे. सेवा हीच खरी समाजाप्रती बांधिलकी असून, संपूर्ण महिनाभर सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

या अभियानांतर्गत चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा तसेच विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. तसेच , नागरिकांनी तयार केलेल्या उल्लेखनीय रील्स उन्नती सोशल फाउंडेशनच्या सोशल मीडिया माध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येणार असून, निवडक उपक्रमांची माहिती पुढील स्तरावर पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. पिंपळे सौदागर परिसरातील लिनिअर गार्डन, राजमाता जिजाऊ उद्यान, कलाकार कट्टा, रस्ते तसेच परिसरातील विविध विकासकामांवर आधारित रील्स तयार करताना संबंधित नगरसेवकांचे नाव स्पष्टपणे नमूद करण्याचे आवाहन करण्यात आले.

# हरियाणातील सफाई कर्मचाऱ्यांवरील पोलिसांच्या मारहाणीचा पुण्यात निषेध

■ पुणे : प्रतिनिधी

वेतनवाढ आणि नोकरी कायम करण्याच्या मागण्यांसाठी हरियाणातील हिसार परिसरात सफाई कर्मचाऱ्यांनी दीर्घकाळ संप पुकारला आहे. या आंदोलनादरम्यान सफाई कर्मचाऱ्यांवर पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोप करत पुणे शहर मेहतर वाल्मिकी महासंघाच्या वतीने या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी निषेध आंदोलन करत संबंधित पोलिसांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. सफाई कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनावर बळाचा वापर करणे योग्य नसून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी पोलिसांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.





यासंदर्भातील निवेदन पुणे निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांना महासंघाच्या शिष्टमंडळाने दिले. सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसह नोकरी कायम करण्याच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही महासंघाच्या वतीने करण्यात आली.

या आंदोलनात पुणे शहर मेहतर वाल्मिकी महासंघाचे अध्यक्ष रवीभाई परदेशी, महासचिव नरेश इंद्रसिंग जाधव, किशोर वाघेला, किशोर भेंडवाल, अर्जुनभाई सोलंकी, महेंद्र लालबिगे, सुरेश देडुंडा, गोपाल वाघमारे, कधीर पठाण आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# लोहगावात अग्निसुरक्षेचा धक्कादायक उलगडा; ११ विनापरवाना पीजी, होस्टेल सील

## अग्निशमन यंत्रणाच नसताना शंभरहून अधिक विद्यार्थी राहत असल्याचे आढळले; जागामालकांवर गुन्हे दाखल करण्याचे आयुक्तांचे आदेश

■ पुणे : प्रतिनिधी

देशभरातील आगीच्या दुर्घटनांच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील रुग्णालये, पीजी, होस्टेल, क्लासेस आदी आस्थापनांचे अग्निसुरक्षा ऑडिट करण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी अग्निशमन विभागाला दिले आहेत. त्यानुसार अग्निशमन प्रमुख गणेश सोनुने यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी पीजी व होस्टेलची अग्निसुरक्षाविषयक तपासणी सुरू करण्यात आली.

लोहगाव येथील निंबाळकर नगर परिसरात करण्यात आलेल्या तपासणीत ११ पीजी व होस्टेलमध्ये अग्निसुरक्षेची कोणतीही स्थायी अथवा अस्थायी यंत्रणा उपलब्ध नसल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. तीन ते चार मजली इमारतींमध्ये शंभरहून अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनी राहत असल्याचे तपासणीत आढळून आले. अशा ठिकाणी आग लागल्यास मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता असल्याने महापालिका प्रशासनाने ही बाब गांभीर्याने घेतली.

तपासणीदरम्यान संबंधित इमारतींना बिल्डिंग परमिशन, ड्रेनेज, पाणीपुरवठा, वृक्ष, स्ट्रक्चरल, कर विभाग तसेच अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र (छजउ) यांसह पीजी व होस्टेलसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही परवानग्या नसल्याचे निदर्शनास आले. विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यानंतर या परिसरातील काही महाविद्यालयांकडून पीजी किंवा होस्टेलसाठी संदर्भ दिला जात असल्याची माहिती समोर आली. नियमांचे उल्लंघन करून अशा अनधिकृत ठिकाणी विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था करून देणाऱ्या जागामालकांवर तसेच संबंधितांकडून नियमभंग झाल्यास गुन्हे दाखल करण्याचे आदेश आयुक्त नवलकिशोर राम यांनी दिले आहेत.





अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन न करणाऱ्या आणि विनापरवाना सुरू असलेल्या पीजी व होस्टेलवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. त्यानुसार अग्निशमन विभाग, महापालिका बांधकाम विभाग आणि अतिक्रमण विभागाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्त कारवाई करत संबंधित ११ पीजी व होस्टेल सील करण्याची कारवाई केली. यापुढे पुणे महापालिकेचा अग्निशमन विभाग शहरातील शाळा, महाविद्यालये, पीजी, होस्टेल, रुग्णालये आणि अन्य आस्थापनांची तपासणी करणार आहे. अग्निसुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. त्यामुळे सर्व आस्थापनांनी अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व कार्यक्षम ठेवावी, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा स्पष्ट इशारा महापालिका प्रशासनाने दिला आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

# डिंभे धरणाच्या बोगद्याला जुन्नरच्या शेतकऱ्यांचा विरोध; वळसे पाटलांच्या भूमिकेला पाठिंबा

## गणपतराव फुलवडे : आंबेगाव, जुन्नर, शिरूरच्या शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी धामणी । प्रतिनिधी

डिंभे धरणातून प्रस्तावित बोगद्याच्या कामाला माजी सहकारमंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी घेतलेली विरोधाची भूमिका ही आंबेगाव, जुन्नर आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या पाण्याच्या हक्काशी संबंधित आहे. या भूमिकेला जुन्नर तालुक्यातील शेतकरी खंबीरपणे पाठिंबा देतील, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस तथा जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष गणपतराव फुलवडे यांनी व्यक्त केला.

खडकवाडी (ता. आंबेगाव) येथील माध्यमिक विद्यालयात जनमित्र स्व. दिनकरराव आवटे यांच्या ३९व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात फुलवडे बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या भूमिपुत्रांचा सन्मान करण्यात आला. शिल्पकार शरद कापुसकर, वरिष्ठ पत्रकार रमेश जाधव, अभियंता सुहास जोशी, ह.भ.प. सुरेखा शिंदे, शास्त्रज्ञ निलेश पोखरकर, सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब इंदोरे आणि कृषी सल्लागार शिवाजी आवटे यांना भूमिपुत्र पुरस्काराने गौरविण्यात आले.



तालुक्यात शंभर टक्के निकाल मिळविणाऱ्या ३३ शाळांचा तसेच दहावी आणि बारावी परीक्षेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

स्व. दिनकरराव आवटे मित्रमंडळाच्या माध्यमातून गेल्या ३९ वर्षांपासून सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात सुरू असलेले कार्य दिशादर्शक असून, या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळत आहे, असे भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील यांनी सांगितले.

कार्यक्रमास प्रशासक सरपंच सविता डोके, माजी सरपंच अनिल डोके, तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील वळसे पाटील, ॲड. राजेंद्र बेंडे पाटील, महाळुंगेच्या प्रशासक सरपंच सुजाता चासकर, माजी जिल्हा परिषद सदस्य डी. के. चासकर, प्रा. अरुण गोरडे आणि खरेदी-विक्री संघाचे माजी संचालक कैलास गायकवाड उपस्थित होते. लेखक तथा निवृत्त प्राचार्य लक्ष्मण वाळुंज यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे नियोजन श्री दत्त पतसंस्थेचे चेअरमन सुनील वाळुंज, डॉ. अमित काळे, अजय आवटे, महेश भालेराव, याकूब इनामदार आणि किसन आवटे यांनी केले. मंडळाचे अध्यक्ष भरत चिखले यांनी प्रास्ताविक केले. सतीश जाधव आणि आत्माराम जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर प्राचार्य एल. डी. पगार यांनी आभार मानले.

---

### सारांश वृत्त

## आम्हीच एनटीए ऑफिसमध्ये जातो अन् काम कसे चालते ते बघतो; 'नीट' प्रकरणी सुप्रीम कोर्ट ॲक्शन मोडवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

नीट पेपर लीकप्रकरणी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू आहे. नीट-यूजी २०२६ पेपर लीक आणि राष्ट्रीय चाचणी संस्थेतील (NTA) सुधारणांशी संबंधित याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने कठोर भूमिका घेतली. सध्याची कार्यप्रणाली खरोखरच कार्यरत आहे की नाही, हे वैयक्तिकरित्या तपासण्यासाठी खंडपीठ एनटीए कार्यालयाला भेट देऊ शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने उच्चाधिकार समितीशी समन्वय साधणाऱ्या सहसचिवांना, समितीने आतापर्यंत केलेल्या सुधारणा आणि प्रगती अहवालावर न्यायालयात सविस्तर प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच न्यायालयाने एनटीएला, सुधारणा आणि प्रगतीचा संपूर्ण तपशील देणारे हे प्रतिज्ञापत्र त्यांच्या अधिकृत वेबसाइटवर सार्वजनिकरित्या अपलोड करण्यास सांगितले आहे. या प्रकरणाची सुनावणी करताना न्या. पी. एस. नरसिंह यांच्या अध्यक्षतेखालील खंडपीठाने स्पष्टपणे सांगितले की, एनटीए मध्ये सुधारणा करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीच्या शिफारसी केवळ कागदावरचा अहवाल न राहता त्यांची पूर्णपणे अंमलबजावणी झाली पाहिजे. ही प्रणाली प्रत्यक्षात अस्तित्वात आहे की नाही, ती कशी कार्यरत आहे, मनुष्यबळ किती आहे आणि इतर व्यवस्था कशी आहे, हे पाहण्यासाठी आम्ही स्वतः एनटीएच्या कार्यालयाला भेट देऊ, असेही न्यायमूर्ती यांनी स्पष्ट केले.

---

# न्यू इंग्लिश स्कूल लाखणगावचा कुस्ती स्पर्धेत दबदबा कायम

## दहा पैकी नऊ विद्यार्थ्यांचे यश; पाच जणांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र
लोणी-धामणी । प्रतिनिधी



पुणे जिल्हा क्रीडा परिषद आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मंचर (ता. आंबेगाव) येथील तालुका क्रीडा संकुलात आयोजित आंबेगाव तालुकास्तरीय शासकीय कुस्ती स्पर्धेत लाखणगाव येथील राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलने यंदाही आपला दबदबा कायम राखला. विद्यालयातील दहा विद्यार्थ्यांनी स्पर्धेत सहभाग घेतला असून, त्यापैकी नऊ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळविले.

स्पर्धेत कावेरी संतोष मुलमुले, छाया गंगाराम कऱ्हे, कार्तिकी गणेश दळे, श्रेया प्रकाश कारकुड, योगेश गुलाब कऱ्हे, रोशन बाळासाहेब धरम, राहुल गंगाराम कऱ्हे, यशराज गणेश दळे, सुरज गोरक्ष दळे आणि इरफान अन्सार चौगुले यांनी सहभाग घेतला.

यामध्ये कावेरी मुलमुले, छाया कऱ्हे, कार्तिकी दळे, श्रेया कारकुड आणि योगेश कऱ्हे यांनी आपल्या गटात प्रथम क्रमांक मिळवून जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली. विद्यालयाच्या कुस्तीपटूंनी मिळवलेल्या या यशामुळे शाळेच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी भर पडली आहे.

या विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षक प्रवीण शिकारे, कल्पना राजगुरू, छाया वाघुंडे, रसिका शिंदे आणि मुख्याध्यापक अनिल देसले यांचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी सहकारमंत्री दिलीपराव वळसे पाटील, जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, संचालिका पूर्वा वळसे पाटील, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष ॲड. प्रदीप वळसे पाटील, मुख्य प्रशासकीय अधिकारी अमरजीत खराडे, शेतमाल प्रक्रिया संघाचे अध्यक्ष सतीश पाटील, खरेदी-विक्री संघाचे संचालक मनोज रोडे पाटील तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ गाडगे, उपाध्यक्ष प्रदीप रोडे पाटील व सदस्यांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांनी शुभेच्छा दिल्या.

---

# वडगाव काशिंबेगचा सोंडरूपी मोरया गणपती भाविकांचे श्रद्धास्थान

## अष्टविनायक यात्रेपूर्वी दर्शनाची परंपरा; गणेशोत्सवात १४ दिवस विविध कार्यक्रम

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मंचर । वृत्तसंस्था

आंबेगाव तालुक्यातील श्री क्षेत्र वडगाव काशिंबेग येथील सोंडरूपी स्वयंभू मोरया गणपती मंदिराला धार्मिक तसेच ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे. या गणपतीची 'अर्धपीठ' म्हणून ओळख असून, सोंडरूपी गणपतीच्या दर्शनाशिवाय अष्टविनायक यात्रा पूर्ण होत नाही, अशी भाविकांची श्रद्धा आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दर्शनासाठी परिसरासह दूरवरून भाविक दाखल होत असल्याने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

वडगाव काशिंबेग येथील हे मंदिर पेशवेकालीन असल्याचे सांगितले जाते. मंदिरातील देवाच्या तेल-वातीसाठी आर्थिक मदत दिल्याची नोंद पेशवेकालीन कागदपत्रांमध्ये असल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर ब्रिटिश राजवटीच्या काळातही मंदिरातील दिवाबत्तीसाठी आर्थिक मदत दिल्याचा संदर्भ आढळतो. त्यामुळे मंदिराला धार्मिक श्रद्धेबरोबरच ऐतिहासिक संदर्भही लाभला आहे.

सोंडरूपी गणपतीचे दर्शन घेतल्यानंतर अष्टविनायक यात्रा सफल होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे. गणेशोत्सव काळात मंदिरात दर्शनासाठी भाविकांची वर्दळ वाढली असून, विविध भागांतून भाविक कुटुंबासह येथे येत आहेत. गणपतीच्या दर्शनाने मनोकामना पूर्ण होतात, अशी भावना भाविक व्यक्त करतात.

या मंदिराला तीर्थक्षेत्राचा 'क' दर्जा प्राप्त झाला आहे. पेशवेकालीन नोंदी तसेच ब्रिटिशकालीन संदर्भांमुळे वडगाव काशिंबेग येथील सोंडरूपी मोरया गणपती मंदिराचे धार्मिक आणि ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित होते.

गणेशोत्सवानिमित्त मंदिर परिसरात 'गणेश फेस्टिव्हल'चे आयोजन करण्यात आले असून, तब्बल १४ दिवस विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. त्यामुळे गणेशोत्सव काळात मंदिर परिसरात भाविकांसह नागरिकांचीही मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे.

---

# हिंजवडी-मान-मारुंजीतील रस्ते विकासाला गती; १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष कामांना सुरुवात

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

हिंजवडी, मान व मारुंजी भागातील रस्ते विकास, वाहतूक कोंडी, भूसंपादन आणि स्थानिक पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. रस्ते विकासासाठी आवश्यक प्रक्रिया वेगाने पूर्ण करून १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डुडी यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीला आमदार शंकर मांडेकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

सहा प्रमुख रस्त्यांचा विकास

हिंजवडी आयटी परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी सहा प्रमुख रस्ते निश्चित करण्यात आले आहेत. या रस्त्यांसाठी भूसंपादन, रस्त्याची आखणी आणि निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी सल्लागार नियुक्तीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. रस्त्यासाठी जमीन देणाऱ्या शेतकरी व जमीनमालकांना त्याचा योग्य आणि जास्तीत जास्त लाभ मिळेल, याबाबत प्रशासनामार्फत आवश्यक मार्गदर्शन करण्यात येणार आहे. संबंधित शेतकरी व जमीनमालकांकडून सुमारे ६० ते ७० टक्के जमिनीची संमती तसेच आगाऊ ताबा उपलब्ध झाल्यानंतर निविदा प्रक्रिया तातडीने सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे रस्ते विकासाच्या कामांना अनावश्यक विलंब होणार नाही, याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले.

भूसंपादनाची ६० ते ७० टक्के प्रक्रिया १५ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करून १ डिसेंबरपासून प्रत्यक्ष रस्ते कामांना सुरुवात करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

मान, मारुंजी आणि हिंजवडी परिसरातील शेतकरी व जमीनमालकांना भूसंपादन, हस्तांतरणीय विकास हक्काचे धोरण, दोन किलोमीटरच्या परिसरातील निवासी वापराचे नियम तसेच जमीन देणाऱ्यांना मिळणाऱ्या लाभांची माहिती देण्यासाठी गावनिहाय मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधून त्यांच्या शंकांचे निरसन करावे, असे निर्देश देण्यात आले.

अतिरिक्त रस्त्यांची पाहणी

स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांच्या मागणीनुसार सहा प्रमुख रस्त्यांव्यतिरिक्त आणखी दोन पर्यायी रस्त्यांची शक्यता तपासण्यात येणार आहे. विप्रो चौक, पुनवळे-मारुंजी जोडरस्ता तसेच कालव्यालगतच्या रस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यकतेनुसार निर्णय घेण्यात येणार आहे.

कालव्यालगत किंवा सिंचन विभागाच्या ताब्यातील जमिनींचा रस्ते विकासासाठी वापर करण्यासंदर्भातील प्रस्ताव ३० सप्टेंबरपर्यंत तयार करून संबंधित कालवा मंडळाकडे मंजुरीसाठी पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात आवश्यक परवानगी मिळवून पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले.

सांडपाणी नदीत जाणार नाही याची दक्षता

हिंजवडी परिसरातील नदी प्रदूषण आणि सांडपाणी व्यवस्थापनाचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. बांधकाम व्यावसायिक आणि आयटी कंपन्यांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते नदीपात्रात जाणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत काही प्रमुख गावांमध्ये सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू असल्याची माहिती देण्यात आली. प्रदूषण नियंत्रणाच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या औद्योगिक व निवासी प्रकल्पांवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्यात येणार आहे.

वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी उपाययोजना

भूमकर चौक, रावेतसह प्रमुख चौक आणि रस्त्यांवरील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी रस्ते रुंदीकरण, खड्डे बुजविणे आणि वाहतुकीतील अडथळे दूर करण्यावर भर देण्यात आला.

---

# सायबर फसवणुकीपासून सावध राहा

## 'लोकसंवाद'मधून गणेश मंडळांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करण्यासाठी जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत चिंचवड परिसरातील विविध गणेश मंडळांमध्ये सायबर पोलिसांकडून मार्गदर्शन करण्यात आले.

पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या सायबर पोलीस ठाण्यातील स्नेहल संजय तिताडे, नारायणी विजय पाटील आणि संगिता संजय पुरी यांनी नवतरुण मंडळ, चिंचवड गाव भाजी मार्केट तसेच गांधी पेठ तालीम मित्र मंडळ येथे नागरिकांशी संवाद साधला. यावेळी सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, फसवणुकीची पद्धत आणि त्यापासून बचाव करण्याच्या उपाययोजनांची माहिती देण्यात आली.




गणेशोत्सवाच्या माध्यमातून शासनाच्या विविध योजना, उपक्रम तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेशी संबंधित माहिती थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती व जनसंपर्क विभागाच्या वतीने 'लोकसंवाद-२०२६' हे विशेष जनजागृती अभियान २४ सप्टेंबरपर्यंत राबविण्यात येत आहे.

सायबर गुन्हेगारांकडून बनावट संदेश, फोन, संशयास्पद लिंक, बनावट संकेतस्थळे आणि ऑनलाइन आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून नागरिकांना आमिष दाखविले जाते. त्यामुळे अनोळखी व्यक्तींना वैयक्तिक, बँकिंग अथवा गोपनीय माहिती देऊ नये. अनोळखी ॲप किंवा फाइल डाउनलोड करू नये तसेच संशयास्पद लिंकवर क्लिक करणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले.

सोशल मीडिया खात्यांची सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी उपलब्ध सुरक्षा सुविधा सुरू ठेवाव्यात. अनोळखी व्यक्तींकडून आलेल्या संदेशांना प्रतिसाद देताना तसेच ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना विशेष खबरदारी घ्यावी, असा सल्लाही सायबर पोलिसांनी दिला.

सायबर फसवणूक झाल्यास घाबरून न जाता तातडीने १९३० या राष्ट्रीय सायबर हेल्पलाइनवर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले. गणेशोत्सवाच्या निमित्ताने नागरिकांच्या मोठ्या सहभागाचा उपयोग करून सायबर सुरक्षेचा संदेश घराघरांत पोहोचविण्याचा प्रयत्न 'लोकसंवाद-२०२६'च्या माध्यमातून करण्यात येत आहे.

---

# व्यक्तिमत्व विकासासाठी संवाद कौशल्य वाढवावे : डॉ. गोविंद कुलकर्णी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी

महाविद्यालयीन काळात विद्यार्थ्यांनी शैक्षणिक अभ्यासक्रम बरोबरच शिस्त आणि सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून व्यक्तिमत्व विकासासाठी संवाद कौशल्य वाढवा, स्व निर्णयक्षमता विकसित झाली की आत्मविश्वास देखील वाढतो. महाविद्यालयाच्या वतीने उपलब्ध केलेल्या विविध संधींचा सदुपयोग करावा आणि आपले करिअर घडवावे असे मार्गदर्शन पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी केले .

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मधील प्रथम वर्ष बी. टेक २०२६-२७ च्या विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात यावेळी पीसीसीओईचे उपसंचालक डॉ. निळकंठ चोपडे, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ. के. राजेश्वरी, डीन डॉ. पी. ए. देशमुख, डॉ. रजनी पी. के., डॉ. एस. व्ही. शिंदे, डॉ. एस. एस. सोनार, डॉ. नरेंद्र देवरे, डॉ. महेश कोलते, डॉ. वर्षा हरपाळे, डॉ. एस. यू. भंडारी, डॉ. रोशनी राऊत, विभाग प्रमुख डॉ. सोनाली पाटील, डॉ. एस. एस. सांबरे, डॉ. ए. डी. ठाकरे, डॉ. अश्विनी वझे, डॉ. जे. व्ही. कट्टी, डॉ. ए. के. गायकवाड, डॉ. एस. बी. माटेकर, डॉ. पी. आर. काळे, शैक्षणिक व सामाजिक शास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. लीना शर्मा, विद्यार्थी व पालक आदी उपस्थित होते.

ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी सांगितले की, जगभर सर्वत्र एआय ची चर्चा आहे. यामुळे गुंतवणूक आणि रोजगार संधी वाटणार आहे. परंतु यासाठी प्रथम आपण उच्च दर्जाचे तांत्रिक कौशल्य प्राप्त करून स्वतःला सक्षम केले पाहिजे. याची जबाबदारी पीसीईटी अंतर्गत असणाऱ्या पीसीसीओई महाविद्यालय सह इतर महाविद्यालय देखील परिपूर्ण आहेत. मात्र विद्यार्थ्यांनी देखील स्वतःचे योगदान देणे तितकेच आवश्यक आहे. डॉ. संदीप पाटील, डॉ. अश्विनी वझे यांनी देखील विद्यार्थी व पालकांना विद्यार्थी सक्षमीकरण, वैयक्तिक विकास, शैक्षणिक उत्कृष्टता आणि जबाबदार नागरिकत्व या विषयी माहिती दिली.

## सारांश वृत्त

### रोजगार मेळाव्यांची घोषणा मोठी; प्रत्यक्ष रोजगार कधी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

मुंबई : प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'लोकसंवाद-२०२६' अभियान राबविले जात आहे. मात्र, रोजगाराच्या प्रश्नावर सरकारकडून केवळ घोषणा, मेळावे आणि प्रसिद्धीपुरतेच प्रयत्न होत आहेत का, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत २९ सप्टेंबर रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच दिवशी तब्बल १ हजार रोजगार मेळावे घेण्याची घोषणा करण्यात आली आहे. गणेश मंडळांमध्ये जाऊन या मेळाव्यांची माहिती देण्यात आली. मात्र, रोजगार मेळाव्याची माहिती देणे आणि प्रत्यक्षात युवकांच्या हाताला कायमस्वरूपी रोजगार मिळणे, यात मोठा फरक आहे.

शासनाच्या प्रसिद्धीमध्ये मेळाव्यांची संख्या ठळकपणे सांगितली जात असली, तरी या मेळाव्यांतून किती युवकांना नोकऱ्या मिळणार, किती जणांना नियुक्तीपत्रे मिळतील आणि त्यापैकी किती रोजगार प्रत्यक्षात टिकतील, याचे स्पष्ट उद्दिष्ट अद्याप नागरिकांसमोर नाही.

गणेश मंडपात जाऊन रोजगाराची माहिती देण्यापेक्षा रोजगार मेळाव्यानंतरचा परिणाम अधिक महत्त्वाचा आहे. मेळावा झाला, गर्दी झाली, अर्ज भरले आणि प्रसिद्धी झाली; पण युवकांच्या हातात नोकरीचे नियुक्तीपत्र आले नाही, तर या संपूर्ण उपक्रमाचे फलित काय?

मेळावा हा कार्यक्रम असतो; रोजगार हा परिणाम असतो. सरकारने कार्यक्रमाची संख्या नव्हे, तर रोजगार मिळालेल्या युवकांची संख्या जाहीर करण्याची वेळ आली आहे.

# पश्चिम बंगालमध्ये मतदारांच्या भवितव्यावर टांगती तलवार! एसआयआरच्या ३८ लाख अपीलांपैकी ३७ लाख अजूनही प्रलंबित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / वृत्तसंस्था

पश्चिम बंगालमधील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरावलोकनाच्या अर्थात एसआयआर प्रक्रियेचा फटका बसलेल्या लाखो मतदारांचे भवितव्य अद्याप न्यायाधिकरणांच्या निर्णयाच्या प्रतीक्षेत आहे. निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात दिलेल्या माहितीनुसार, एसआयआरनंतर दाखल झालेल्या सुमारे ३८ लाख अपीलांपैकी तब्बल ३७ लाखांहून अधिक अपील अद्याप प्रलंबित आहेत. आतापर्यंत केवळ १,०२,२३१ अपीलांचा निपटारा करण्यात आला आहे.

वशेष म्हणजे, या प्रकरणांसाठी सर्वोच्च न्यायालयाने अपीलीय न्यायाधिकरणांची रचना करून सहा महिन्यांहून अधिक काळ उलटला आहे. तरीही १९ न्यायाधिकरणांमध्ये मोठ्या



प्रमाणावर प्रकरणे प्रलंबित असल्याने मतदार यादीत आपले नाव कायम आहे की नाही, याबाबत अनेक नागरिकांसमोर अनिश्चितता निर्माण झाली आहे.

निवडणूक प्रक्रियेत मतदाराचे नाव मतदार यादीत असणे ही मूलभूत बाब असताना, लाखो अपीलांचा इतका मोठा अनुशेष गंभीर प्रशासकीय आणि निवडणूक प्रक्रियेचा प्रश्न निर्माण करतो. याच काळात पश्चिम बंगालमधील महापालिका निवडणुका जवळ येत आहेत. त्यामुळे न्यायाधिकरणांमधील प्रलंबित प्रकरणांचा वेग आणि त्यांचा अंतिम निकाल याला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

एखाद्या मतदाराने आपले नाव वगळण्यात आल्याविरोधात अपील केले असेल, मात्र त्यावर निर्णयच झाला नसेल, तर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्याच्या मतदानाच्या अधिकाराचे काय होणार, हा प्रश्न उपस्थित होतो. एसआयआरचा उद्देश मतदार यादी अधिक अचूक आणि विश्वासार्ह करणे हा असल्याचे निवडणूक आयोगाचे म्हणणे आहे. मात्र प्रक्रियेतून वगळण्यात आलेल्या नागरिकांना वेळेत प्रभावी अपील आणि निवारणाची संधी मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. ३८ लाख अपीलांपैकी केवळ सुमारे एक लाख प्रकरणे निकाली निघाल्याची आकडेवारी या प्रक्रियेच्या गतीवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करते. आता महापालिका निवडणुका तोंडावर असताना, उर्वरित लाखो मतदारांच्या अपीलांवर निर्णय कधी होणार, हा प्रश्न सर्वोच्च न्यायालयासमोरही महत्त्वाचा ठरणार आहे.

## १५ वर्षांखालील मुलांच्या पासपोर्ट नियमांत मोठा बदल; आता पाच वर्षे किंवा वयाची १८ वर्षे पूर्ण होईपर्यंतच वैधता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

परदेश प्रवासाची तयारी करणाऱ्या पालकांसाठी केंद्र सरकारने पासपोर्टच्या नियमांमध्ये महत्त्वाचा बदल केला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने (एमईए) 'पासपोर्ट (दुरुस्ती) नियम, २०२६' अधिसूचित केले असून, १५ वर्षांखालील मुलांना जारी करण्यात येणाऱ्या सामान्य पासपोर्टच्या वैधतेबाबत नवा नियम लागू केला आहे. या बदलामुळे लहान मुलांच्या पासपोर्टची वैधता आता त्यांच्या वयानुसार निश्चित होणार आहे.

परराष्ट्र मंत्रालयाने १५ सप्टेंबर २०२६ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेद्वारे पासपोर्ट नियम, १९८० मधील नियम १२ मध्ये दुरुस्ती केली आहे. नव्या नियमानुसार, १५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलाला दिला जाणारा ३६ पानांचा सामान्य पासपोर्ट पाच वर्षे किंवा संबंधित मुलाचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत, यापैकी जे आधी होईल तोपर्यंतच वैध राहणार आहे.

याचा अर्थ, एखाद्या मुलाला वयाच्या १४व्या वर्षी पासपोर्ट मिळाला, तर तो पासपोर्ट पाच वर्षांसाठी नव्हे, तर मुलाचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंतच वैध राहील. त्यामुळे प्रत्यक्ष वैधता चार वर्षांपेक्षा कमी असू शकते. त्याचप्रमाणे अगदी लहान वयात पासपोर्ट काढल्यास पाच वर्षांची वैधता मिळू शकते.

यापूर्वी लहान मुलांच्या पासपोर्टच्या वैधतेसंदर्भातील तरतुदींमध्ये वेगळी व्यवस्था होती. आता सरकारने पाच वर्षे किंवा १८ वर्षे पूर्ण होणे, यापैकी जे आधी येईल, हा स्पष्ट निकष निश्चित केला आहे. या बदलाचा थेट परिणाम मुलांसाठी पासपोर्ट काढणाऱ्या पालकांवर होणार आहे. विशेषतः १५ वर्षांच्या आसपास पासपोर्ट काढणाऱ्या मुलांच्या पालकांनी त्याची अंतिम वैधता लक्षात घेणे आवश्यक ठरणार आहे. परदेश प्रवास, व्हिसा प्रक्रिया किंवा पासपोर्ट नूतनीकरणाचे नियोजन करताना नव्या नियमाचा विचार करावा लागणार आहे. नियमांमध्ये केलेली ही दुरुस्ती पासपोर्ट नियम, १९८० मध्ये औपचारिक बदल करत असून, अल्पवयीन मुलांच्या पासपोर्ट वैधतेबाबतचा संभ्रम दूर करण्याचा प्रयत्न म्हणून तिच्याकडे पाहता येते.

## नंदीग्राममध्ये ममतांचा उमेदवारच मैदानाबाहेर; काँग्रेसला पाठिंबा, निवडणुकीआधी बंगालच्या राजकारणात मोठी उलथापालथ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

कोलकाता : प्रतिनिधी

पश्चिम बंगालच्या नंदीग्राम विधानसभा पोटनिवडणुकीआधी राजकारणाला अचानक नाट्यमय वळण मिळाले आहे. ममता बॅनर्जी यांच्या गटाच्या उमेदवार संचित प्रधाण डे यांनी शुक्रवारी, १८ सप्टेंबर रोजी आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. त्यामुळे ६ ऑक्टोबरला होणाऱ्या नंदीग्राम पोटनिवडणुकीत ममता बॅनर्जी यांच्या गटाचा उमेदवारच उरलेला नाही. त्यानंतर ममता बॅनर्जी यांनी नंदीग्राममध्ये काँग्रेसच्या उमेदवाराला पाठिंबा देण्याची घोषणा केली.

संचिता प्रधाण डे यांनी उमेदवारी मागे घेण्याच्या काही तास आधी पश्चिम



बंगालचे मुख्यमंत्री आणि नंदीग्रामचे विद्यमान आमदार सुवेंदू अधिकारी यांची नबन्ना येथे भेट घेतली होती. या भेटीनंतर त्यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे. मात्र, उमेदवारी मागे घेण्यामागचे त्यांचे अधिकृत कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

या घडामोडीची पार्श्वभूमीही तितकीच महत्त्वाची आहे. निवडणूक आयोगाने १७ सप्टेंबर रोजी तृणमूल काँग्रेसचे पारंपरिक 'फूल आणि गवत' हे चिन्ह आणि पक्षाचे मूळ नाव तात्पुरते गोठवले. त्यानंतर ममता बॅनर्जी यांच्या गटाला 'ममता ऑल इंडिया तृणमूल काँग्रेस' हे नाव आणि 'फुटबॉलपटू' हे निवडणूक चिन्ह देण्यात आले, तर प्रतिस्पर्धी गटाला 'डेमोक्रॅटिक तृणमूल काँग्रेस' आणि 'लिफाफा' हे चिन्ह देण्यात आले. हा निर्णय आगामी पोटनिवडणुकांपुरता अंतरिम स्वरूपाचा आहे.

निवडणूक आयोगाच्या निर्णयावर ममता बॅनर्जी यांनी तीव्र आक्षेप घेतला असून, हा निर्णय मनमानी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. त्याच पार्श्वभूमीवर नंदीग्राममध्ये स्वतःचा उमेदवार मागे घेत काँग्रेसला पाठिंबा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ममतांनी हा निर्णय व्यापक हितासाठी आणि विरोधी आघाडी मजबूत करण्याच्या उद्देशाने घेतल्याचे सांगितले आहे.

नंदीग्राम हा ममता बॅनर्जी यांच्या राजकीय प्रवासातील अत्यंत महत्त्वाचा मतदारसंघ राहिला आहे. त्यामुळे पोटनिवडणुकीच्या काही आठवडे आधी उमेदवारी मागे घेणे आणि काँग्रेसला पाठिंबा देणे, यामुळे बंगालच्या आगामी राजकीय समीकरणांकडे विशेष लक्ष लागले आहे.

# डीप-टेकला २,१७० कोटींचा निधी; ५६ कंपन्यांमध्ये गुंतवणूक, पण संशोधनातून बाजारपेठेपर्यंतचा प्रवास अजूनही आव्हानात्मक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतातील डीप-टेक क्षेत्राला चालना देण्याच्या सरकारी दाव्यांच्या पार्श्वभूमीवर इंडिया डीप टेक अलायन्सने (आयडीटीए) गेल्या वर्षभरातील गुंतवणुकीची आकडेवारी जाहीर केली आहे. भारत आणि परदेशातील आयडीटीएच्या सदस्यांनी मिळून देशातील ५६ डीप-टेक कंपन्यांमध्ये तब्बल २,१७० कोटींची गुंतवणूक केल्याचे अलायन्सने सांगितले. सेमीकॉन इंडिया २०२६ कार्यक्रमात ही माहिती जाहीर करण्यात आली.

मात्र, ही रक्कम आयडीटीएने एकत्रितपणे किंवा एखाद्या सामूहिक निधीतून गुंतवलेली नसून, अलायन्सच्या प्रत्येक सदस्याने आपल्या स्वतंत्र गुंतवणूक धोरणानुसार आणि प्रक्रियेनुसार स्वतंत्रपणे केलेली गुंतवणूक असल्याचे आयडीटीएने स्पष्ट केले आहे. त्यामुळे २,१७० कोटींच्या आकडेवारीकडे सरकारी किंवा संस्थात्मक एकत्रित निधी म्हणून पाहणे अचूक ठरणार नाही.

डीप-टेकमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, प्रगत उत्पादन तंत्रज्ञान, रोबोटिक्स, संरक्षण तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि इतर उच्च-तंत्रज्ञान क्षेत्रांचा समावेश होतो. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर संशोधन, भांडवल आणि दीर्घकालीन गुंतवणुकीची आवश्यकता असते. त्यामुळे ५६ कंपन्यांमध्ये झालेली गुंतवणूक भारतीय डीप-टेक उद्योगासाठी महत्त्वाची असली, तरी तिचे दीर्घकालीन परिणाम कंपन्यांच्या व्यावसायिक विस्तारावर आणि तंत्रज्ञानाच्या प्रत्यक्ष वापरावर अवलंबून राहणार आहेत.

सरकारचे प्रधान वैज्ञानिक सल्लागार अजय कुमार सूद यांनी या गुंतवणुकीचे स्वागत करताना, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या १ लाख कोटींच्या संशोधन, विकास आणि नवोन्मेष (आरडीआय) योजनेमागील 'दृष्टी' आता मोजता येण्याजोग्या कृतीत रूपांतरित होऊ लागल्याचे म्हटले. सरकारने संशोधन आणि नवोन्मेषासाठी मोठ्या निधीची घोषणा केली असली, तरी केवळ निधी उपलब्ध होणे पुरेसे ठरणार नाही. संशोधनातून प्रत्यक्ष उत्पादने, देशांतर्गत तंत्रज्ञाननिर्मिती, पेटंट, रोजगार आणि जागतिक बाजारपेठेतील स्पर्धात्मक कंपन्या निर्माण होतात का, यावर या धोरणांची खरी परिणामकारकता ठरणार आहे. २,१७० कोटींची गुंतवणूक हा प्रारंभिक टप्पा असला, तरी भारताच्या डीप-टेक महत्त्वाकांक्षेची खरी परीक्षा आता गुंतवणुकीचे परिणाम किती ठोस आणि मोजता येण्याजोगे ठरतात, यावर होणार आहे.

# भारतीय नागरिकत्वाची चौकशी न करताच बांगलादेशात हद्दपार? सर्वोच्च न्यायालयाचा केंद्र-महाराष्ट्राला नोटीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

पश्चिम बंगालमधील एका महिलेचे भारतीय नागरिकत्व तपासण्याची योग्य प्रक्रिया न राबवता तिला मुंबईतून बांगलादेशात पाठवण्यात आल्याच्या आरोपाने गंभीर कायदेशीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या प्रकरणाची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी, १७ सप्टेंबर रोजी केंद्र सरकार आणि महाराष्ट्रातील संबंधित अधिकाऱ्यांना नोटीस बजावली.

साहिन फकीर यांनी दाखल केलेल्या याचिकेत त्यांच्या आई साहिदा फकीर यांना परत भारतात आणण्याची मागणी करण्यात आली आहे. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, साहिदा या पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील गोविंदापूर येथील भारतीय नागरिक असून, सुमारे २० वर्षांपूर्वी पतीसोबत रोजगारासाठी मुंबईत आल्या होत्या आणि तेथे घरकाम करत होत्या.

याचिकेनुसार, १९ जुलै रोजी मुंबईत त्यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांची आधारकार्डासह कागदपत्रे आणि मोबाइल जप्त करण्यात आला. त्यांना १०० तासांहून अधिक काळ ताब्यात ठेवण्यात आले आणि न्यायालयीन दंडाधिकाऱ्यासमोर हजर करण्यात आले नाही, असा



आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर त्यांना सीमा सुरक्षा दलाकडे सोपवून बांगलादेशच्या सीमेपलीकडे पाठवण्यात आल्याचा दावा याचिकेत आहे.

या प्रकरणाला पश्चिम बंगालमधील विशेष सखोल मतदारयादी पुनरावलोकन (एसआयआर) प्रक्रियेचीही पार्श्वभूमी आहे. साहिदा यांचे नाव मतदारयादीतून वगळण्यात आले होते; मात्र या निर्णयाविरोधातील त्यांचे अपील अद्याप प्रलंबित असल्याचे याचिकेत म्हटले आहे. याचिकाकर्त्याने जुन्या मतदारयादीतील कुटुंबीयांच्या नोंदींचाही दाखला दिला आहे. याचिकेत २ मे २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या बेकायदेशीर बांगलादेशी नागरिक आणि रोहिंग्यांच्या हद्दपारीसंदर्भातील मानक कार्यपद्धती (एसओपी) तसेच इमिग्रेशन अँड फॉरिनर्स ऑर्डर, २०२५ यांच्या वैधतेलाही आव्हान देण्यात आले आहे. याचिकाकर्त्याचा दावा आहे की भारतीय नागरिकत्वाचा दावा करणाऱ्या व्यक्तीला प्रभावी चौकशी आणि आपले नागरिकत्व सिद्ध करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे.

मुख्य न्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने नोटीस बजावली आहे. मात्र, न्यायालयाने अद्याप महिलेचे भारतीय नागरिकत्व, कथित हद्दपारी किंवा संबंधित प्रक्रियेच्या वैधतेबाबत कोणताही अंतिम निष्कर्ष दिलेला नाही. पुढील सुनावणीत केंद्र आणि महाराष्ट्र प्रशासनाच्या उत्तरानंतर या प्रकरणातील कायदेशीर आणि प्रक्रियात्मक प्रश्न स्पष्ट होणार आहेत.

# सहावीच्या विद्यार्थ्यांवर ऐन शैक्षणिक वर्षात नवा भाषेचा बोजा नको; सर्वोच्च न्यायालयाची केंद्राला १ जानेवारी २०२७ची मुदत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) तीन-भाषा धोरणाच्या अंमलबजावणीवरून सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला महत्त्वाची सूचना केली आहे. सध्याच्या शैक्षणिक वर्षात सहावीत असलेल्या विद्यार्थ्यांवर अचानक तीन-भाषा धोरण लादण्याऐवजी १ जानेवारी २०२७पासून सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ते अनिवार्य करण्याचा विचार करावा, असे न्यायालयाने गुरुवारी, १७ सप्टेंबर २०२६ रोजी सुचवले. विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या कुटुंबांना धोरणाशी जुळवून घेण्यासाठी आवश्यक वेळ मिळावा, हा या सूचनेमागील प्रमुख मुद्दा होता.

सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या तीन सदस्यीय खंडपीठासमोर सीबीएसईच्या तीन-भाषा धोरणाला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सुनावणी झाली. सीबीएसईने २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून नव्या भाषाविषयक व्यवस्थेची अंमलबजावणी सुरू केली आहे. या धोरणानुसार विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकाव्या लागणार असून त्यापैकी किमान दोन भाषा भारतीय असणे अपेक्षित आहे.

या धोरणावरून विद्यार्थ्यांचे पालक आणि याचिकाकर्त्यांनी ऐन शैक्षणिक वर्षात नियम बदलल्यामुळे निर्माण होणाऱ्या व्यावहारिक अडचणींकडे न्यायालयाचे लक्ष वेधले. यापूर्वीही न्यायालयाने भारतीय भाषांसाठी आवश्यक शिक्षक, पाठ्यपुस्तके आणि शैक्षणिक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत का, असा प्रश्न उपस्थित केला होता. २० ऑगस्ट २०२६च्या सुनावणीत न्यायालयाने सीबीएसईच्या शाळांमध्ये विविध भाषांच्या अध्यापनासाठी पुरेशी क्षमता आहे का, याची माहिती मागितली होती.

१७ सप्टेंबरच्या सुनावणीत केंद्राच्या वतीने अतिरिक्त सॉलिसिटर जनरल ऐश्वर्या भाटी यांनी सीबीएसईची भूमिका न्यायालयासमोर मांडली. मात्र, खंडपीठाने सध्याच्या सहावीच्या विद्यार्थ्यांना काही काळाची सवलत देण्याबाबत पुन्हा विचार करण्याचे आवाहन केले. न्यायालयाने सुचवले की, सध्याच्या विद्यार्थ्यांसाठी तिसरी भाषा ऐच्छिक ठेवता येईल आणि पुढील टप्प्यात ती अनिवार्य करता येईल. यामुळे विद्यार्थी आणि पालकांना अचानक बदलाचा सामना करावा लागणार नाही.

या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इंग्रजीला 'मातृभाषा नसलेली' किंवा 'स्थानिक नसलेली' भाषा मानण्याचा प्रश्न. २० ऑगस्टच्या सुनावणीत न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांनी इंग्रजीच्या भारतातील ऐतिहासिक वापराचा आणि काही राज्यांमधील तिच्या अधिकृत स्थानाचा विचार करण्याची गरज व्यक्त केली होती. त्याचवेळी विविध भारतीय भाषा शिकवण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक आणि योग्य पाठ्यपुस्तकांची उपलब्धता याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. यापूर्वी १४ जुलै २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने तीन-भाषा धोरणाला स्थगिती देण्यास नकार दिला होता. मात्र, त्यानंतरच्या सुनावण्यांमध्ये धोरणाची अंमलबजावणी, वेळापत्रक आणि पायाभूत तयारी यावर न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले. १७ सप्टेंबरच्या सुनावणीत केंद्राने न्यायालयाच्या सूचनांवर सीबीएसईकडून निर्देश घेऊन परत येण्याचे मान्य केले. त्यामुळे १ जानेवारी २०२७पासून सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन-भाषा धोरण अनिवार्य होईल, असा अंतिम न्यायालयीन आदेश अद्याप झालेला नाही; सध्या हा सर्वोच्च न्यायालयाचा विचार करण्यासाठी दिलेला प्रस्ताव आहे. या प्रकरणातील याचिकांवरील पुढील सुनावणीमध्ये केंद्र आणि सीबीएसईची भूमिका स्पष्ट होणार आहे.